**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/३८/२०२४

दिनांक -३१.०१.२०२५

**प्रति,**

१. काडाप्पा सिदगोंडा माळी

रा. दरिबडची, ता. जत, जि. सांगली .... अपिलार्थी

**विरुध्द**

१. शिवानंद भिमराव माळी

२. प्रकाश भिमराव माळी

३. चंद्रकांत भिमराव माळी

४. दयानंद भिमराव माळी

५. जयश्री हणमंत कोरे

अ.क्र.१ रा. आनंद प्रॉस्पेरा अपार्टमेंट, ए विंग ६ वा मजला प्लाट नंबर ६०६, अंबाई ट्रॅक रंकाळा पश्चिम हरीओम नगर जवळ कोल्हापूर

अ.क्र.२ रा.वैष्णवी वुडस,सी.एस.एम.पी ग्रिनच्या शेजारी, प्रातापनगर रोड,सोलापूर

अ.क्र.३ रा.मंत्री चंडक पार्क, विजयपूर रोड, सोलापूर ४१३००४

अ.क्र.४ रा. दरिबडची ता. जत जि.सांगली

अ.क्र.५ रा.खडकी पो.देवकुरूळी ता.तुळजापूर जि.धाराशिव ..... जाबदार

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे. दरिबडची, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर १२४६, ११९६, ११९७, १२४८ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी,संख यांनी फेरफार नंबर १६९, दिनांक १३.०४.१९८९ प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे. दरिबडची, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर १२४६, ११९६, ११९७, १२४८ या मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी,संख यांनी फेरफार नंबर १६९, दिनांक १३.०४.१९८९ प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे. प्रस्तूतचे अपिल दाखल करणेस अपिलार्थी यांना जवळपास ३४ वर्षे इतका विलंब झालेला आहे. त्याकामी अपिलार्थी यांनी विलंब माफी अर्ज दाखल केला आहे.

२. प्रकरणातील फेरफार नंबर १६९ पाहता अपिलार्थी यांची मागणी ही दिवाणी स्वरूपाची आहे. त्याबाबत त्यांनी सक्षम दिवाणी न्यायालयात दाद मागणे गरजेचे आहे. अपिलार्थी यांनी ३४ वर्षाचे विलंबाने दाखल केलेले अपील कोणत्याही वैध कारणाशिवाय विलंब माफ करता येणार नाही. तसेच विलंब माफ करणेकामी कोणतेही संयुक्तिक कारण अपिलार्थी यांनी दिलेले नाही त्यामुळे विलंब माफ करता येणार नाही. तसेच अपिलार्थीची मागणी ही दिवाणी स्वरूपाची असलेने अपिलार्थी यांचे अपील विलंबाचे मुद्दयावर फेटाळणे आवश्यक असलेबाबतचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**निकालपत्रातील नमुद कारणास्तव प्रस्तुत अपिलार्थी यांचा अपील अर्ज विलंब माफीच्या मुद्दयावर फेटाळणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

उप विभागीय अधिकारी, जत उपविभाग, जत

**( अजयकुमार नष्टे )**
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक -३१.०१.२०२५

प्रत -अपर तहसिलदार संख यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.